कृपया प्रसिध्दीसाठी - 12 मार्च 2009

## जागतिक किडनी दिवसानिमित्ताने श्री राम नाईक यांच्या हस्ते किडनी शिबिराचे उद्‌घाटन

मुंबई, गुरुवार : ''जगभरामध्ये कॅन्सर व हृदयरोगानंतर सर्वाधिक मृत्यू किडनीच्या विकारांमुळे होतात, म्हणून वेळेवर आपली तपासणी करुन किडनीसारख्या महत्वाच्या अवयवाच्या विकारांपासून बचाव करणे हे आजच्या काळात फार आवश्यक आहे'' असे प्रतिपादन माजी केंद्रिय पेट्रोलियम मंत्री श्री राम नाईक यांनी आज येथे केले.

जागतिक किडनी दिवसाच्या निमित्ताने गोरेगाव येथे व्हिनस कल्चरल सेंटर व लायन्स क्लब ऑफ मिलेनियमच्या संयुक्त विद्यमाने किडनी परीक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्‌घाटन केल्यानंतर आयोजकांचे अभिनंदन करताना श्री नाईक म्हणाले, '' व्हिनस कल्चरल सेंटरमध्ये डायालिसिसची सोय केवळ 300 रुपयांत उपलब्ध आहे, याचा लाभ रुग्णांनी जरुर घेतला पाहिजे. मात्र अशी दुर्दैवी वेळ आपल्यावर येऊच नये याकरीतां वेळेवर तपासणी करणे महत्वाचे आहे.'' यावेळी बोलताना व्हिनस ट्रस्ट चे विश्वस्त श्री जयप्रकाश ठाकुर यांनी उपस्थितांना ट्रस्टद्वारा चालणा-या डायालिसीस सेंटरची माहिती दिली.

या शिबिरात स्थानिक नगरसेविका व माजी उपमहापौर सौ. विद्या ठाकुर, लायन्स डिस्ट्रिक्ट चेअरमन (डायालिसीस) श्री रोशनलाल बन्सल, लायन श्री. मदनमोहन केजरीवाल व भारतीय जनता पार्टीचे उत्तर मुंबई जिल्हा अध्यक्ष श्री. योगेश सागर उपस्थित होते. शिबिरासाठी आलेल्या शेकडो रुग्णांची डॉ. राजेशकुमार व डॉ. रचना यांनी तपासणी केली.

(कार्यालय मंत्री)